भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक १४.१०.२०२० ते १८.१०.२०२०)

| अंक ८१/२०२० | | | | | | | दिनांक १३.१०.२०२० | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०६/१०/२०२० ते १२/१०/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १४/१०/२०२० ते १८/१०/२०२० पर्यंत) | | | | |
| ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | दिनांक | १४/१० | १५/१० | १६/१० | १७/१० | १८/१० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | १९.५ | ३४.९ | पाऊस (मि. मी) | ३० | १२० | २७ | ३४ | ३९ |
| ३३.० | ३३.० | ३५.० | ३३.० | ३३.० | ३३.० | ३३.० | कमाल तापमान (अं. से) | ३० | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २२.० | २३.० | २३.० | २६.० | २४.० | २३.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | २४ | २४ | २५ | २४ | २४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार — मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९६ | ९८ | ९८ | ९२ | ९३ | ९६ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९४ | ९६ | ९५ | ९४ | ९४ |
| ७३ | ७१ | ६२ | ७१ | ८५ | ८५ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ९० | ९२ | ९० | ८९ |
| ०.० | ०.४ | ०.३ | ०.१ | ०.३ | ०.३ | ०.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ७ | १३ | १० | १० | १० |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | वायव्ये कडे | पश्चिमे कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे | दक्षिणे कडे |
| पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | स्थिर | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | दुपार — वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी)न्य | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४६०८.८ | ४६०५.६ | ५४.४ |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक १४ ते १८ ऑक्टोबर, २०२० या कालावधी दरम्यान दिनांक १४, १६,१७ व १८ ऑक्टोबर रोजी बहुतांश ठिकाणी मध्यम तर दिनांक १५ ऑक्टोबर रोजी बहुतांश ठिकाणी अति मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर तापमानात काही अंशी घट होऊन हवामान आर्द्र व पुर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची, दिनांक १५ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह अत्यंत मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची, तर दिनांक १७ व १८ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | दिनांक १४ ते १८ ऑक्टोबर रोजी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने विजांच्या बचावापासुन शेतक-यांनी शेतामध्ये कामे करताना सावधानता बाळगावी. तसेच चारावयास सोडलेल्या दुभत्या जनावरांचे विजापासुन संरक्षण करण्यासाठी दुभती जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावी. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | येत्या ५ दिवसांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात मेघगर्जनेसह वादळी पाऊसाची शक्यता लक्षात घेता कापणी व मळणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | हळव्या जातीः- कापणी<br><br>निम गरव्या व गरव्या जातीः- फुलोरा ते दाणे भरणे | गेल्या आठवड्यामध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होता तसेच पुढील पाच दिवसांमध्ये मध्यम ते अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>जिल्हयात पुढील पाच दिवसांमध्ये मध्यम ते अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्या कारणाने कोणतीही कापणी करु नये. |
| नागली | फुलोरा | जिल्हयात पुढील पाच दिवसांमध्ये मध्यम ते अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्या कारणाने कोणतीही कापणी करु नये. |
| भुईमुग | फुलोरा ते आरा अवस्था | पुढिल पाच दिवसामध्ये मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भुईमुगामध्ये पाणी साचु न देता साचलेल्या पाण्याचा निचरा करावा. |
| आंबा | नवीन पालवी | पुढिल पाच दिवसामध्ये मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता आंबा बागेमध्ये तण नियंत्रण, किड नियंत्रण व रोग नियंत्रण यांच्यासाठीच्या फवारण्या पुढिल सुचना प्राप्त होईपर्यंत पुढे ढकलण्यात याव्या. |
| काजु | - | मळ्याच्या क्षेत्रातील काजु बागेतुन अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>पुढिल पाच दिवसामध्ये मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता काजु बागेमध्ये किड नियंत्रण व रोग नियंत्रण यांच्यासाठीच्या फवारण्या पुढिल सुचना प्राप्त होईपर्यंत पुढे ढकलण्यात याव्या.<br>मोठया काजू बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | जिल्ह्यामध्ये काजु बागांना नविन पालवी येत असुन पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे.<br>काजुवरील फांदेमर रोगाच्या नियंत्रणासाठी फांद्या कट करुन त्यावर 1 टक्का बोर्डोपेस्ट लावावी. पाऊस संपल्यानंतर १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी संपुर्ण बागेत करावी.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| नारळ | फळ विकास | पुढिल पाच दिवसामध्ये मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ बागेमध्ये पाणी साचु न देता साचलेल्या पाण्याचा निचरा करावा. |
| सुपारी | फळ विकास | पुढिल पाच दिवसामध्ये मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता सुपारी बागेमध्ये पाणी साचु न देता साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.<br>सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये 1 टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | फळ धारणा | पुढिल पाच दिवसामध्ये मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भाजीपाला पिकामध्ये पाणी साचु न देता साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.<br>नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करावे. वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळया | - | दिनांक १४ ते १८ ऑक्टोबर रोजी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने विजांच्या बचावापासुन शेतक-यांनी शेतामध्ये कामे करताना सावधानता बाळगावी. तसेच चारावयास सोडलेल्या दुभत्या जनावरांचे विजापासुन संरक्षण करण्यासाठी दुभती जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |